## थोडक्यात...

### देवदरी येथे श्री हनुमान मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात संपन्न



(ज्ञानेश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

**कळमनुरी -** तालुक्यातील देवदरी येथे श्री हनुमान मंदिराचा कलशारोहण सोहळा शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी या पवित्र सोहळ्याची सुरुवात झाली. या सोहळ्यास परमपूज्य १०८ श्री महादेव शिवाचार्य महाराज (श्री गुरू टोटलिंग स्वामी संस्थान, कळमनुरी) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या शुभ हस्ते मंदिराचा कलशारोहण विधी विधीपूर्वक पार पडला. या कार्यक्रमात मौजे वाई व देवदरी शिवारातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले तसेच धार्मिक विधींमध्ये सहभागी होत वातावरण भक्तिमय केले. कलशारोहणानंतर दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन देवदरी येथील श्री राजू उमाशंकर (आप्पा) यांच्या शेतात करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन समस्त देवदरी शिवार मंडळी, मौजे वाई तसेच राजू अण्णा पाटणे परिवार, कळमनुरी यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहकार्य केले.

### मानवत ईदगाह मैदानाची सखोल पाहणी

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

**मानवत-** रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर मानवत शहरात प्रशासनाने तयारीला वेग देत ईदगाह मैदानाची सखोल पाहणी करून विविध सुविधांचा आढावा घेतला. या पाहणीमध्ये नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष डॉ. अंकुश लाड व मुख्याधिकारी कोमल सावरे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ईद-उल-फितरच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो मुस्लिम बांधव एकत्र येऊन नमाज अदा करणार असल्याने मैदानातील सर्व व्यवस्था सुरळीत राहाव्यात यासाठी विशेष लक्ष देण्यात आले. पाहणीदरम्यान मैदानाची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता, वीज पुरवठा, तसेच गर्दी नियोजन यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांनी मैदानातील विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देत आवश्यक त्या सुधारणा तत्काळ करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः, भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पाणी टँकर, तात्पुरती पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना, तसेच स्वच्छतागृहांची स्वच्छता यावर भर देण्यात आला. तसेच, सणाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन सेवा तत्पर ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून सण निर्विघ्न पार पाडावा, असेही यावेळी सांगण्यात आले. या यावेळी नगरसेवक नियमात खान पठाण , नगर अभियंता सय्यद अन्वर , आशिष पोरवाल , आनंद वर्मा , इरफान बागवान व बळीराम दहे हे उपस्थित होते. नगरपरिषद प्रशासनाच्या या तयारीमुळे यंदाची ईद उत्साहपूर्ण, सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात साजरी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# अमली पदार्थ तसेच गुटखा विक्रीच्या साम्राज्याला संपविण्याचा विडा;जिल्ह्यात पोलिसांचे धाडसत्र सुरू! मात्र अन्न,भेसळ व औषध प्रशासन गप्प का?

(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)




**परभणी -** जिल्ह्यात मादक पदार्थ,गुटखा आणि तथाकथित 'कॉपी शॉप'च्या माध्यमातून सुरू असलेल्या अवैध विक्रीबाबत दै.धर्मयोद्धाने ९ मार्च रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्ताचा मोठा परिणाम जिल्हाभर दिसू लागला आहे.या वृत्तानंतर जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या वतीने कारवाईचा वेग वाढवत विविध ठिकाणी धाडसत्र सुरू केले असून गुटखा विक्री व वाहतुकीवर आळा घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत पानटपऱ्या,किराणा दुकाने आणि काही 'कॉपी शॉप'च्या नावाखाली गुटखा, सुगंधी तंबाखू आणि इतर प्रतिबंधित पदार्थांची विक्री सुरू असल्याची तक्रार नागरिकांकडून होत होती.विशेष म्हणजे शाळकरी मुले व विद्यार्थी वर्ग या व्यसनाच्या आहारी जात असल्याची बाबही समोर आली होती.या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर पोलिसांनी सक्रिय पावले उचलल्याचे दिसत आहे.मात्र गेंड्याची कातडी पांघरून अन्न व औषध प्रशासन विभाग चिडीचूप असून त्या विभागाने कार्यवाही करण्याची मागणी होत असतानाच आता अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी शांत होऊन संत झाले का?असा सवाल उपस्थित केला जात असून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. मात्र जिल्ह्याचे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे मात्र धाडसत्र चालु असून अवैध व्यवसायांवर धाडसत्र टाकून धाडसी कार्यवाहीत माहीर असलेल्या पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**पालम येथे मोठी कारवाई!**

दिनांक १६ मार्च २०२६ रोजी पालम पोलीस स्टेशनच्या हद्दीत फरकंडा ते गुलखंड पाटी जवळ सार्वजनिक रस्त्यालगत पोलिसांनी छापा टाकत मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केला. या कारवाईत सुमारे ५२ हजार ७५ रुपये किमतीचा गुटखा तसेच महिंद्रा कंपनीचा छोटा हत्ती वाहन (सुमारे २ लाख ५० हजार रुपये किंमत) असा एकूण ३ लाख २ हजार ७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एक आरोपी ताब्यात घेतल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण पोलिसांकडून देण्यात आली आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक परिहार, हेड कॉन्स्टेबल कागणे, हेड कॉन्स्टेबल वाघ आणि पोलीस कॉन्स्टेबल सावंत यांनी सहभाग घेतला. संबंधितांवर भारतीय न्याय संहिता भारतीय न्याय संहितेमधील कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**परभणी शहरातही छापा!**

दिनांक १७ मार्च २०२६ रोजी परभणी शहरातील साखला प्लॉट परिसरात कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने गुटखा विक्रीवर कारवाई केली. या वेळी ८ हजार २९८ रुपये किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एक आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक जगताप, पोलीस उपनिरीक्षक परिहार आणि त्यांच्या टीमने केली असून प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीवर पोलिसांची नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**गंगाखेडमध्ये वाहनासह मोठा मुद्देमाल जप्त!**

दरम्यान, दिनांक १५ मार्च २०२६ रोजी गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत परळी रोड परिसरात पोलिसांनी धाड टाकून १३ हजार ४७५ रुपये किमतीचा 'डायरेक्टर' नावाचा गुटखा तसेच सुमारे ३ लाख रुपये किमतीचे महिंद्रा पिकअप वाहन असा एकूण ३ लाख १३ हजार ४७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक परिहार,हेड कॉन्स्टेबल महेश कवठाळे,हेड कॉन्स्टेबल राहुल परसोडे आणि पोलीस कॉन्स्टेबल दिलीप निलपत्रेवार यांनी सहभाग घेतला.

**बातमीचा 'इम्पॅक्ट' जिल्ह्यात चर्चेचा विषय** जिल्ह्यात सुरू असलेल्या या कारवायांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, अवैध गुटखा आणि मादक पदार्थ विक्री करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दै. धर्मयोद्धाने या विषयावर सातत्याने आवाज उठवल्यानंतर प्रशासन हालचाल करत असल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात सुरू आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि पालकांकडूनही या कारवाईचे स्वागत करण्यात येत असून, ''तरुण पिढीला व्यसनापासून वाचवण्यासाठी अशा धाडसी मोहिमा सातत्याने सुरू राहाव्यात,'' अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अवैध व्यवसायांविरोधात लढा सुरूच दरम्यान, जिल्हा पोलिसांनी गुटखा, मादक पदार्थ आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. येत्या काळातही अशा कारवाया सुरू राहणार असल्याचे सांगितले जात आहे. दै. धर्मयोद्धा आणि त्यांची वार्ताहर टीम समाजहितासाठी तसेच नव्या पिढीला नशेच्या आहारी लोटणाऱ्या असामाजिक घटकांविरोधात आपली लढाई यापुढेही सुरू ठेवणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## चिमुकल्या अदिबाची श्रद्धा मोठी; पाचव्या वर्षीच पहिला रोजा पूर्ण

(वजीर पठाण/ दै.धर्मयोध्दा)



**ताडकळस-** पवित्र रमजान महिन्यानिमित्त सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. इस्लाम धर्मातील या पवित्र महिन्यात रोजा ठेवणे म्हणजे आत्मशुद्धी, संयम आणि अल्लाहप्रती निष्ठा व्यक्त करण्याचे प्रतीक मानले जाते. या पार्श्वभूमीवर ताडकळस येथील अवघ्या पाच वर्षीय चिमुकली अदिबा फिरोज पठाण हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करत सर्वांसमोर प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे. कडक उन्हाचा पारा असतानाही तिने अत्यंत श्रद्धा, निष्ठा आणि उत्साहाने हा रोजा पाळला. तिच्यासाठी हा रोजा केवळ परंपरा नसून भाईचारा, प्रेम आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. रोजा पूर्ण केल्यानंतर अदिबाने देशात तसेच जगात शांती, सौहार्द आणि समृद्धी नांदावी यासाठी अल्लाहकडे दुआ केली. तिच्या या निरागस कृतीचे परिसरात मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून लहान वयातच धार्मिक जाणीव जपणारी अदिबा ही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या पहिल्या रोजामुळे ताडकळस परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आर्य वैश्य समाजाकडून नुतन वर्ष गुढीपाडव्या निमित्त हाती ध्वज पताके घेऊन ढोल ताशांच्या गजरात भव्य दिव्य रॅली



**लोहा -** चैत्र शुक्ल प्रतिपदेला हिंदू धर्माचे नुतन वर्ष हे गुढीपाडव्या पासून सुरू होत असल्याने हा शुभ मुहूर्त म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.सकाळी मुहूर्त वेळेनुसार रोजी घरोघरी गुढी उभारल्यानंतर लोहा शहरातील समस्त आर्य वैश्य समाजातील पुरूष महिला युवक यांनी नववर्षाच्या आगळं वेगळं स्वागत करण्यासाठी नगरेश्वर मंदिरात एकत्र जमून सर्वांनी फेटे बांधून हाती ध्वज पताके घेऊन वाजत गाजत भव्य दिव्य अशी जल्लोषात भव्य दिव्य रॅली काढली.

हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या दिवशी दि.१९ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता नगरेश्वर मंदिरात दर्शन घेऊन तेथून भाजी मंडई, शिवकल्याण नगर, माऊली नगर परत नगरेश्वर मंदिर असे मार्गक्रमन करून आर्य वैश्य समाजाची भव्य दिव्य रॅली मोठ्या थाटामाटात संपन्न झाली. यावेळी रॅलीमध्ये सहभागी महिला पुरुष युवक सर्वजण पारंपरिक पोशाख घालून भगवा फेटा बांधून मुखे परमेश्वराचे नामस्मरण करत ढोल ताशा वाद्यांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने मोठ्या थाटामाटात सहभागी झाले होते.

यावेळी आर्य वैश्य समाज कमिटीतील सर्व पदाधिकारी तसेच महिला, पुरुष, युवक यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून भव्य दिव्य रॅली संपन्न झाल्याबद्दल आर्य वैश्य समाज कमिटीचे अध्यक्ष दिनेश सावकार तेललवार यांनी संपूर्ण समाज बांधवांचे आभार मानले.

## पाथरीतील माळीवाड्यात श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

(गणेश जत्ती /दै.धर्मयोध्दा)



**पाथरी-** तालुक्यातील माळीवाडा येथील श्री हनुमान मंदिर, कुंभार बावडी येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह चैत्र शुद्ध ८ पासून म्हणजेच दि. २६ मार्च २०२६ पासून सुरू होऊन चैत्र पौर्णिमेला दि. २ एप्रिल २०२६ रोजी सांगता होणार आहे. या धार्मिक सोहळ्यास अनंत श्री विभूषित १००८ वेदांताचार्य, महामंडलेश्वर स्वामी मनिषानंद पुरीजी महाराज (रूठी आश्रम) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून विविध मान्यवर कीर्तनकार व प्रवचनकारांची उपस्थिती लाभणार आहे. सप्ताहात ह.भ.प. भागवताचार्य बाळु महाराज उगले गव्हाणकर, विश्वंभर महाराज मालोदे, उत्तरेश्वर महाराज (आळंदी), योगेश महाराज गायके, स्वामी महेश्वरानंद महाराज गिरी, ज्ञानेश्वर महाराज भारती, संतोष महाराज दैठणकर आदींची प्रवचने होणार आहेत. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, हनुमान चालिसा, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, हरिपाठ तसेच रात्री हरिकीर्तन व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महिला मंडळाच्या वतीने ज्ञानेश्वरी पारायण तर नामदेवनगर येथील भजनी मंडळींकडून गाथा भजन सादर होणार आहे. दि. २ एप्रिल रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत ग्रंथ दिंडी मिरवणूक काढण्यात येणार असून सकाळी १० ते १२ या वेळेत स्वामी मनिषानंद पुरीजी महाराज यांचे प्रवचन होणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहासाठी समस्त गावकरी मंडळी व नवयुवक तरुण मंडळ, माळीवाडा यांच्या वतीने आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## गुढीपाडव्याचा सन म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक गुढीपाडवा परंपरेनुसार कृष्णा काळे यांनी घराबाहेर उभारली गुढी

(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा-** गुढीपाडवा हा मराठी हिंदूंचा सर्वात महत्त्वाचा सण असून, तो चैत्र शुद्ध प्रतिपदेला मराठी नवीन वषार्ची सुरुवात म्हणून साजरा केला जातो. या दिवशी घराबाहेर काठी, तांब्या, कडुलिंबाची पाने आणि रेशमी वस्त्राची गुढी उभारून, तसेच कडुनिंब-गुळाचा प्रसाद ग्रहण करून विजय आणि समृद्धीचे स्वागत केले जाते. नववषार्चा प्रारंभहा दिवस



हिंदू पंचांगानुसार मराठी नवीन वषार्चा पहिला दिवस मानला जातो विजय आणि सृष्टीचा उत्सवः प्रभू रामचंद्रांनी रावणावर विजय मिळवून अयोध्येत परतल्याच्या आनंदात ही गुढी उभारली जाते, असे मानले जाते तसेच, ब्रह्मदेवाने या दिवशी सृष्टीची निर्मिती केली, टाळी वाजवावी गुढी उभारावी वाट हे चालावी पंढरीची अशीही पौराणिक धारणा आहे गुढीपाडवा हा हिंदू धमार्तील साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक आहे, त्यामुळे या दिवशी नवीन वस्तूंची खरेदी, व्यवसाय प्रारंभकिंवा नवीन उपक्रम करणे शुभ मानले जाते गुढीची पूजा बांबूच्या काठीला रेशमी कापड, कडुलिंबाच्या फांद्या, फुलांचा हार आणि साखरेची गाठी बांधून, त्यावर तांब्या (उपडी लोटी) ठेवून गुढी तयार केली जाते आणि तिची स्वच्छता, पूजा केली जाते. सकाळच्या वेळी घराची रांगोळी, अभ्यंगस्नान आणि नवीन वस्त्रे परिधान करून गुढी उभारली जाते. तसेच शेतकरी नवीन सालगडी या मुहूर्तावर ठरवतात. हा सण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात, साजरा केला जातो.

## "अंगणवाडी की धोकादायक ढासळती इमारत?" मालेगाव शहरातील लहानग्यांच्या भवितव्याशी खेळ!

(प्रदिप सावले/दै.धर्मयोध्दा)



**मालेगाव -** शहरातील अंगणवाड्या बनल्या धोकादायक तसेच शहरातील तहसील कार्यालयाच्या मागील भागात असलेल्या अंगणवाडी क्रमांक ५ ची अवस्था अत्यंत दयनीय व धोकादायक बनली असून,येथे शिक्षण घेणाऱ्या लहान चिमुकल्यांचे आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे या अंगणवाडीची इमारत पूर्णपणे जीर्ण व पडक्या अवस्थेत असून,मुलांना बसण्यासाठी सुद्धा व्यवस्थित जागा उपलब्ध नाही काही ठिकाणी छत व भिंतींचे तुकडे पडलेले आहेत व काही पडण्याच्या अवस्थेत सुद्धा आहेत अशा परिस्थितीत लहान मुलांनी नेमके कुठे बसावे,हा प्रश्न निर्माण झाला आहे याहूनही गंभीर बाब म्हणजे, बालकांसाठी येणारे पोषण आहार (राशन) उघड्यावरच ठेवण्यात येत असून,त्याची स्वच्छता व गुणवत्ता पूर्णपणे संशयास्पद आहे काही स्थानिकांनी सांगितले की,हे अन्न खाण्यायोग्य नसल्याने अनेक वेळा ते वापरलेही जात नाही विशेष म्हणजे,मालेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांमध्ये अंगणवाड्या व शाळा सुस्थितीत असून,रंगरंगोटी व चांगल्या बांधकामासह सुविधा उपलब्ध आहेत मात्र,मालेगांव शहरातील अंगणवाड्यांची अशी दुर्दशा का?असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे मालेगाव शहरातील अंगणवाड्यांसाठी निधीच नाही का? लहान मुलांच्या आरोग्याशी असा खेळ का केला जात आहे? मालेगाव शहरातील काही परिसरातील प्रभागातील अंगणवाडी तसेच अंगणवाडी क्रमांक ५ तहसील मागील परिसरातील ही परिस्थिती प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण ठरत आहे संबंधित महिला व बालविकास विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने तात्काळ लक्ष घालूनअंगणवाडी इमारतीची दुरुस्ती किंवा नव्याने बांधकाम करावे मुलांसाठी सुरक्षित व स्वच्छ बसण्याची व्यवस्था करावी पोषण आहाराची गुणवत्ता तपासून योग्य वितरण करावे तसेच,मालेगाव शहरातील अंगणवाड्या व जिल्हा परिषद शाळा या नगरपंचायत विभागाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात,जेणेकरून स्थानिक पातळीवर त्यात सुधारणा होऊ शकतील,अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही,तर एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही!

## नवोदय पात्रता परीक्षेत पीएम श्री जि. प. प्रा. शाळा वडीची उतुंग झेप दोन विद्यार्थ्यांची निवड; एका विद्यार्थिनीचा प्रतीक्षा यादीत समावेश



(मुरलीधर गोंगे/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी -** पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडी येथील विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालय पात्रता परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय पात्रता परीक्षेत शाळेतील कु. श्रेया उद्धव कुटे आणि ऋषिकेश ज्ञानेश्वर भिसे या विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. तसेच आरुषी नागेश शिंदे हिचा प्रतीक्षा यादीत समावेश झाला आहे. या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांच्या वतीने गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णकुमार शिंदे, गटशिक्षणाधिकारी मुकेश राठोड, केंद्रप्रमुख शिवकुमार पुरी तसेच मुख्याध्यापक संजय चिंचाने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उल्लेखनीय यशामुळे पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडीच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटला आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao